**जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधित नागरिकांना मदत देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**मदत व पुनर्वसन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ३२२ /मदत-१(म-३ )**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ ऑगस्ट, २०२६

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२१/प्र.क्र. २०३/म-३,दि.११.०८.२०२१
४) मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दि. २८.०७.२०२६ बैठकीतील निर्णय

**प्रस्तावना:-**

माहे जुलै २०२६ या कालावधीत पालघर जिल्हा व वसई-विरार महानगर पालिका क्षेत्रात अतिवृष्टी व ढगफुटीसदृश्य पाऊस होऊन पूर आल्याने घरांचे, कपड्यांचे, घरगुती भांडी व वस्तू, पशुधन तसेच, दुकानदार, टपरीधारक यांच्या झालेल्या नुकसानीबाबत बाधित नागरिकांना मदत देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.०७.२०२६ रोजी बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

जुलै २०२६ मध्ये पालघर जिल्हा व वसई-विरार महानगर पालिका क्षेत्रात ढगफुटीसदृश्य पाऊस होऊन पूर आल्याने उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे विशेष बाब म्हणून (ज्याठिकाणी ५०० मिमी पेक्षा २४ तासात किंवा २-३ दिवसात सलग पाऊसामुळे ५०० मिमी पेक्षा पाऊस झालेला असेल, त्या लगतच्या भागात ज्या ठिकाणी पाणी साचलेले असेल) झालेल्या नुकसानीसाठी बाधित नागरिकांना, खालीलप्रमाणे मदत प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मदतीची बाब व निकष** | **निकष व मदतीचे वाढीव दर** | **मदत निधी देण्यासाठी कार्यपध्दती** |
|---|---|---|---|
| १. | पुरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या तसेच स्थलांतरित केलेल्या कुटुंबांना सानुग्रह अर्थसहाय्य | **मदतीचे दर**<br>प्रति कुटुंब रु. १०,०००/- कपड्यांचे नुकसानीकरिता<br><br>प्रति कुटुंब रू. १०,०००/- घरगुती भांडी/वस्तु यांच्या नुकसानीकरिता<br>४८ तासापेक्षा अधिक कालावधीकरिता क्षेत्र/घर पाण्यात बुडालेले असण्याची अट शिथील करण्यात येत आहे. | राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये बसत असलेल्या प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) खर्च करण्यात यावा.<br><br>शिथील केलेली निकषाची अट व वाढीव दराच्या फरकानुसार देय होणारा खर्च, लेखाशीर्ष २२४५-२१९४ मधुन राज्य शासनाच्या निधीमधुन करण्यात यावा. |
| २. | पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी | रू. १,५०,०००/- प्रति घर | राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये बसत असलेल्या प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) खर्च करण्यात यावा.<br><br>वाढीव दराच्या फरकानुसार देय होणारा खर्च लेखाशीर्ष २२४५-२३२७ मधुन राज्य शासनाच्या निधीमधुन करण्यात यावा |
| ३. | अंशतः पडझड झालेल्या (किमान ५०%) पक्क्या/ कच्च्या घरांसाठी | रू. ५०,०००/- प्रति घर | |
| ४. | अंशतः पडझड झालेल्या (किमान २५ %) पक्क्या/कच्च्या घरांसाठी | रू. २५,०००/- प्रति घर | |
| ५. | अंशतः पडझड झालेल्या (किमान १५%) कच्च्या/पक्क्या घरांसाठी | रू. १५,०००/- प्रति घर | |
| ६. | नष्ट झालेल्या झोपडयांसाठी | रू. १५,०००/- प्रति झोपडी<br>शहरी भागात मात्र ही मदत घोषित केलेल्या झोपडपट्टी पट्ट्यातील पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपडयासाठी देय राहील. ग्रामीण भागात अतिक्रमित झोपडी जे नियमितीकरणास पात्र आहेत पण अद्याप नियमितीकरण झालेली नाहीत ती पात्र राहतील) | |
| ७. | अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना मृत पशुधनासाठी मदत | • दुधाळ जनावरे - रू. ४०,०००/- प्रति जनावर<br><br>• ओढकाम करणारी जनावरे - रु. ३२,०००/- प्रति जनावर<br><br>• ओढकाम करणारी लहान जनावरे -रू. २०,०००/- प्रति जनावर | राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये बसत असलेल्या प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) खर्च करण्यात यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • मेंढी/बकरी/डुकर- रु. ४०००/-प्रति जनावर<br><br>(कमाल ३ दुधाळ जनावरे किंवा कमाल ३ ओढकाम करणारी जनावरे किंवा कमाल ६ लहान ओढकाम करणारे जनावरे किंवा कमाल ३० लहान दुधाळ जनावरे प्रति कुटुंब या मर्यादेत)<br><br>• कुक्कुटपालन पक्षी- रु. १००/- प्रति पक्षी, अधिकतम रु. १०,०००/- प्रति कुटुंब | वाढीव दराच्या फरकानुसार देय होणारा खर्च लेखाशीर्ष २२४५-२३६३ मधुन राज्य शासनाच्या निधीमधुन करण्यात यावा. |
| ८. | मत्य बोटी व जाळयांसाठी अर्थसहाय्य | • बोटीचे अंशतः नुकसान - रु. १०,०००/-<br><br>• बोटींचे पुर्णत : नुकसान - रु. २५,०००/-<br><br>• जाळयांचे अंशतः नुकसान- रु. ५,०००/-<br>• जाळयांचे पुर्णतः नुकसान- रू. ६,०००/- | राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये बसत असलेल्या प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) खर्च करण्यात यावा.<br><br>वाढीव दराच्या फरकानुसार देय होणारा खर्च लेखाशीर्ष २२४५-२३८१ मधुन राज्य शासनाच्या निधीमधुन करण्यात यावा. |
| ९. | हस्तकला / हातमाग कारागिर ( यामध्ये बारा बलुतेदार, मुर्तीकार इ. यांचा समावेश राहील) | • जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत त्यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रू.५०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी. | राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषामध्ये बसत असलेल्या प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून (एसडीआरएफ) खर्च करण्यात यावा.<br><br>वाढीव दराच्या फरकानुसार देय होणारा खर्च लेखाशीर्ष २२४५-२३८१ मधुन राज्य शासनाच्या निधीमधुन करण्यात यावा. |
| १०. | दुकानदार | • जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा दुकानदारांपैकी अधिकृत ( नोंदणीकृत व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ | या बाबींसाठी होणारा खर्च राज्य शासनाच्या निधीतून करण्यात यावा.<br>(लेखाशीर्ष २२४५ -२३८१) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | खालील परवानाधारक) दुकानदार यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रू.५०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी. | |
| ११. | टपरीधारक | • जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा टपरीधारकांपैकी अधिकृत ( नोंदणीकृत व परवानाधारक) टपरीधारक यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रू.१०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी | या बाबींसाठी होणारा खर्च राज्य शासनाच्या निधीतून करण्यात यावा.<br>(लेखाशीर्ष २२४५ -२३८१) |
| १२. | कुक्कुटपालन शेडचे नुकसान | रू. ५०००/- इतकी मदत देण्यात यावी. | या बाबींसाठी होणारा खर्च राज्य शासनाच्या निधीतून करण्यात यावा.<br>(लेखाशीर्ष २२४५ -२३८१) |

मदतीची रक्कम प्रदान करताना संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या इतर अटी शर्ती लागू राहतील.

२. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधील विहित निकषाव्यतिरिक्त अथवा दरापेक्षा अधिक दराने देण्यात येणाऱ्या मदतीची रक्कम वरील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्याप्रमाणे राज्य शासनाच्या निधीतून त्या त्या लेखाशीर्षांखाली खर्च करण्यात यावी.

३. वरील मदतीच्या बाबी व निकषा व्यतिरिक्त इतर बाबींच्या नुकसानीसाठी संदर्भाधीन क्रमांक २ तेथील शासन निर्णयामध्ये विहित करण्यात आलेले राज्य आपती प्रतिसाद निधीचे निकष व मदतीचे दर लागू राहतील.

४. पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत. त्यानंतर तातडीने यासाठी निधी वितरित केल्यानंतर रक्कम आहरित करून लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तातंरित करावी. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. सदर निधी अनावश्यकरित्या आहरित करून बैंक खात्यामध्ये काढून ठेवण्यात येवू नये. लाभार्थ्यांना मदत

वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील केंद्र शासनाच्या ndmis.mha.gov.in या संकेतस्थळावरील प्रणालीमध्ये भरण्याची कार्यवाही जिल्हाधिकारयांनी करावी.

५. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा व उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची राहील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४३२/२०२६/व्यय-९, दिनांक ०३.०८.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. याबाबतची देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार व सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८०३१८१९३६७१४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून टाकण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SURYAWANSHI
SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2026.08.03 18:20:48 +05'30'

**(संपत सूर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
९. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
११. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई
१२. विभागीय आयुक्त, कोकण.
१३. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे
१४. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१५. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१६. जिल्हाधिकारी, पालघर
१७. आयुक्त, वसई-विरार, महानगर पालिका
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
२०. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
२१. कार्यासन अधिकारी (मदत-३ (म-११) मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२२. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२३. निवड नस्ती (कार्यासन/ मदत-१/ म-३ )